शासन मान्य
प्रयत्न आमचे, विश्वास तुमचा...
दारू सोडवा
हमखास!
सिगारेट / गुटखा / गांजा / मावा सोडवा
(न सांगता किंवा सांगून सोडवा)
जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र
डॉ.विलास पाठक : 8308113114, 9422240654
वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६
पत्ता: शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर अलीपुर रोड बार्शी

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १२१ वा | सोमवार, दि. ०९ डिसेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ‘बॅलेटवर मतदान घ्या, निवडणूक पद्धत बदला’




# शरद पवारांचं मारकडवाडीतून चोख प्रत्युत्तर

विकणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजूस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४३५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

**माळशिरस (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालापासून सोलापुरातील मारकडवाडी हे गाव देशभरात चर्चेत आलं आहे. माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी गावात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार उत्तमराव जानकर यांच्या गटाने ईव्हीएमवर शंका उपस्थित केली आहे.

त्यामुळे जानकर गटाच्या काही ग्रामस्थांनी बॅलेट पेपरवर चाचणी मतदान घेण्याचे नियोजन केलं होतं. मात्र प्रशासनाच्या विरोधानंतर हा निर्णय मागे घेण्यात आला. शरद पवार यांनीही या वादात उडी घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीकास्त्र डागलं होतं. त्यानंतर आता मारकडवाडीतूनच शरद पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीसांना प्रत्युत्तर दिलं आहे.

विधानसभा निवडणुकीत ईव्हीएमच्या वापराला विरोध करत सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी गावात काही ग्रामस्थांनी मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याचा निर्णय घेतला होता. यासाठी उत्तमराव जानकर गटाने बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी प्रशासनाकडे केली. मात्र ही मतदान प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत नसल्याचा निवाळा प्रशासनाने दिला आणि जानकर यांच्यासह १०० जणांवर गुन्हा दाखल केला. त्यानंतर उत्तमराव जानकर यांनी ही निवडणूक प्रक्रिया रद्द केली. त्याच पार्श्वभूमीवर शरद पवार हे मारकडवाडी ग्रामस्थांसोबत संवाद साधण्यासाठी पोहोचले होते. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या टीकेवर भाष्य केलं.

रविवारी शरद पवार हे मारकडवाडीत पोहोचले होते. यावेळी शरद पवार यांनी ईव्हीएम विरोधात आंदोलन उभारणाऱ्या मारकडवाडीतील ग्रामस्थांचे म्हणणे ऐकूण घेतले. "निवडणुकीमध्ये कोणी जिंकतं तर कोणी हरतं. पण महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत लोकांच्या मनात निवडणूक प्रक्रियेवर साशंकता आहे आणि मतदारांना विश्वास वाटत नाही. आम्ही ईव्हीएमच्या माध्यमातून निवडणुका लढवतो. मतदार मतदानासाठी जातात आणि आत्मविश्वासाने बाहेर पडतात पण काही निकालांमुळे लोकांमध्ये शंका निर्माण झाली आहे," असं शरद पवार म्हणाले.

"आज जगात कुठेच ईव्हीएमचा वापर होत नाही. मग भारताच याचा वापर का सुरू आहे. तुमच्या गावाने एका वेगळ्या पद्धतीने जायचे ठरवले तर सरकाने तुमच्याविरोधात खटला भरला. माझी तुम्हाला विनंती आहे, तुमच्यावर दाखल करण्यात आलेल्या खटल्याची सर्व माहिती मला द्या. याबाबतची तक्रार आम्ही राज्याचा निवडणूक आयोग, मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांकडे देऊ," असंही शरद पवार म्हणाले.

### देवेंद्र फडणवीसांना प्रत्युत्तर

"मी निवडणुकीच्या निकालावर भाष्य केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी मला सल्ला दिला. त्यांनी सांगितले की, पवार साहेबांनी हे करणे योग्य नाही. मी काय चुकीची गोष्ट केली? तुमच्या गावी येणे, तुमचे म्हणणे ऐकून घेणे चुकीचे आहे? लोकांच्या मनात काही शंका आहेत. त्याबद्दल जाणून घेणे, त्याचे निरसन करणे चुकीच आहे का?" असा सवाल शरद पवारांनी केला.

### काय म्हणाले होते देवेंद्र फडणवीस?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट करत शरद पवारांवर भाष्य केलं होतं. "पवार साहेब आपण ज्येष्ठ नेते आहात, किमान आपण तरी देशातील जनतेची दिशाभूल करू नका. पराभव स्वीकारला तर यातून लवकर बाहेर याल. तुम्ही तरी आपल्या सहकाऱ्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला द्याल, अशी अपेक्षा आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं होतं.

# मंत्रिमंडळ विस्तारात सोलापुरातून देशमुखांना संधी की नव्या चेहऱ्याला पसंती?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महायुती सरकारचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा बहुचर्चित शपथविधी सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. शपथविधीनंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याचे संकेत दिले आहेत, त्यामुळे भाजपला भरभरून देणाऱ्या सोलापूरला पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारात संधी मिळणार का? आणि मिळाली तर मंत्रिपदाचा मान नेमका कोणाला मिळणार?, याची उत्सुकता आहे.

राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार विधीमंडळाच्या नागपूर अधिवेशनापूर्वी करण्यात येईल, असे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्याच पत्रकार परिषदेत दिले आहेत. मंत्रिमंडळाचा विस्तार हा ११ किंवा १२ डिसेंबरला होण्याची शक्यता आहे. कारण, विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून नागपूरमध्ये सुरू होत आहे. त्यापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात येणार आहे.



विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे तब्बल पाच आमदार निवडून आले आहेत. मागील निवडणुकीत भाजपचे पाच आमदार आणि एका अपक्षाचा भाजपला पाठिंबा होता. मात्र, मागील पंचवार्षिकमध्ये सोलापूरला मंत्रिपदाची संधी मिळाली नव्हती. मागील पंचवार्षिक एवढीच ताकद सोलापूरने भाजपला पुन्हा दिली आहे, त्यामुळे या वेळी तरी भाजपकडून सोलापूरला मंत्रिपदाची संधी मिळणार का, याची उत्सुकता आहे.

सोलापुरातून सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे, देवेंद्र कोठे हे पाच आमदार कमळाच्या चिन्हावर निवडून आलेले आहेत. यातील दोन्ही देशमुख आणि सचिन कल्याणशेट्टी हे मंत्रिपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे. सुभाष देशमुख आणि विजयकुमार देशमुख यांनी मागील देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात काम केले आहे.

दोन्ही देशमुख हे भाजपमध्ये वरिष्ठ आहेत, त्यामुळे नैसर्गिक न्यायाने त्यांचा मंत्रिपदावर दावा आहे. सुभाष देशमुख यांनी सहकार मंत्री म्हणून काम केले आहे. तसेच विजयकुमार देशमुख हे फडणवीसांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री होते. हायकमांडकडून या वेळी त्यांच्या नावाला पसंती मिळते का नाही, हे महत्वाचे आहे. देशमुखांसोबत अक्कलकोटमधून दुसऱ्यांदा निवडून आलेले सचिन कल्याणशेट्टी हेही देवेंद फडणवीस यांचे अत्यंत निकटवतीय म्हणून ओळले जातात. महायुती सरकारच्या काळात त्यांचा उल्लेख 'डमी पालकमंत्री' म्हणून केला जात होता. त्यामुळे दोन देशमुखांमधील गटबाजीला टाळून कल्याणशेट्टींना मंत्रिपदाची संधी मिळू शकते.

देवेंद्र फडणवीस यांच्या युवा टीममधील सर्वात चर्चेत असणार चेहरा म्हणजे देवेंद्र कोठे. ते पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आले आहेत. मात्र, पक्षातील गटबाजी मोडून नव्या चेहऱ्याला पसंती द्यायचे ठरले तर कोठे यांनाही राज्यमंत्रिपदी संधी मिळू शकते.

# 5 जानेवारीपर्यंत मराठा आरक्षणाची मागणी पूर्ण करा, अन्यथा सामुदायिक उपोषण

## जरांगे पाटलांचं सरकारला नवं अल्टिमेटम

**जालना (कटूसत्य वृत्त):-** राज्यात नव्या सरकारचा 5 डिसेंबर रोजी शपथविधी सोहळा पार पडला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री आणि अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.

या सर्व घडामोडींदरम्यान मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सरसावले आहेत. शपथविधी होताच त्यांनी पुन्हा सरकारला अल्टिमेटम देत आमरण उपोषणाचा इशारा दिलाय.



जालन्यामध्ये माध्यमांसोबत बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, मुख्यमंत्री अन् दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचं अभिनंदन आहे. सरकारमधील तिघेही जुने पुन्हा नव्याने आले आहेत. दीड वर्षापासून मराठा आरक्षणाचा प्रश्न सुरू आहे, त्यांना तो नवीन नाही. त्यामुळे मराठा आरक्षणाची मागणी 5 जानेवारीपर्यंत पूर्ण करावी, नाही तर अंतरवाली सराटीमध्ये कोट्यवधी मराठा समाज सामुदायिक उपोषणासाठी येईल, असा मनोज जरांगे यांनी सरकारला इशारा दिलेला आहे.

मनोज जरांगे पाटील यावेळी म्हणाले की, मराठा समाजामध्ये गोरगरीब लोक असून समाजाला आरक्षणाची गरज आहे. मागील दीड वर्षापासून मराठा आरक्षणाचा लढा सुरू आहे. सरकारमध्ये केवळ खांदेपालट झालीय. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री जुने आहेत. त्यामुळे सरकारला आरक्षणविषयी नवीन निवेदन देण्याची गरज नाही. सगेसोयऱ्यांची व्याख्या परत सांगण्याची गरज नसल्याचं जरांगेंनी स्पष्ट केलीय. सरकार स्थापन केल्यानंतर आता मंत्रिमंडळ स्थापन होईल. त्यानंतर जर मराठा आरक्षणासंदर्भात निर्णय न घेतल्यास अंतरवाली सराटीत उपोषणाची तारीख जाहीर केली जाईल, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिलाय.

मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे राज्याचं पालकत्व आहे. त्यामुळे आता मराठा आरक्षणाचा निर्णय घेण्यासाठी सरकारला 5 जानेवारीपर्यंतचा वेळ आहे. जर मराठा आरक्षणाचा प्रश्न निकाली काढला नाही तर, अंतरवाली सराटीत सामुदायिक बेमुदत उपोषण केलं जाईल, असा मनोज जरांगेंनी सरकारला इशारा दिलाय. आंदोलनाची तारीख जाहीर झाल्यानंतर अंतरवाली सराटीत लाखांत नाही तर कोट्यवधीत मराठा समाज एकत्र येईल, असा इशारा जरांगे पाटलांनी दिलाय. त्याचप्रमाणे जरांगे म्हणाले की, समाज माझ्यासोबत आहे. कोणी कितीही आरोप केले तरी फरक पडत नाही.

# मंत्रिमंडळ विस्तार लांबणार?

## तीन पक्षांच्या नेत्यांची चर्चा; नंतर दिल्लीकडून मंजुरी



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार ११ किंवा १२ डिसेंबरला होणार असे महायुतीचे नेते सांगत असले तरी हा विस्तार १४ डिसेंबरला होण्याची शक्यता आहे. तिन्ही पक्षांच्या नेत्यांनी आपापली नावे निश्चित करणे, नंतर मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्र्यांमधील त्याबाबतची चर्चा आणि दिल्लीकडून मंजुरी या प्रक्रियेमुळे विलंब होईल, असे सध्याचे चित्र आहे.

विधिमंडळाचे नागपुरातील हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून सुरू होत आहे. त्यापूर्वी विस्तार केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर माध्यमांना सांगितले होते. शिंदेसेनेचे नेते आमदार भरत गोगावले, आ. संजय शिरसाट यांनी विस्तार ११ किंवा १२ डिसेंबरला होईल, अशी माहिती माध्यमांना दिली होती.

मात्र, खात्रीलायक सूत्रांनी सांगितले, की या दोन्ही दिवशी शपथविधी होण्याची शक्यता कमी आहे. विधानसभेचे अधिवेशन ९ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. त्यानंतर एक दिवस मध्ये जाऊन लगेच ११ तारखेला विस्तार करणे शक्य नसेल. मुख्यमंत्री फडणवीस हे १२ डिसेंबरला दिवसभर नागपुरात असतील. त्यामुळेच १४ तारखेला मुंबईत किंवा तेही शक्य झाले नाही तर अधिवेशनाच्या आदल्या दिवशी म्हणजे १५ डिसेंबरला नागपुरात नवीन मंत्र्यांचा शपथविधी होऊ शकतो.

(पान 2 वर..)

# तानाजी सावंत यांना पुन्हा आरोग्य मंत्री पद मिळावे म्हणून विठुरायाला साकडे



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूरमध्ये टाळ-मृदंगाच्या गजरात तानाजी सावंत यांना राज्याच्या मंत्रिमंडळात आरोग्यमंत्री म्हणून पुन्हा एकदा लाखो वारकऱ्यांच्या सेवेची संधी मिळावी म्हणून वारकऱ्यांनी विठुरायाच्या चरणी प्रार्थना केली आहे. महाराष्ट्राचे माजी आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी त्यांच्या कार्यकाळात संपूर्ण महाराष्ट्रातील वारकरी बांधवांसाठी आरोग्यसेवेचे अनेक उपक्रम राबवले. आषाढी वारी आणि कार्तिकी वारीदरम्यान लाखो वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देत सावंत यांनी वारकऱ्यांच्या आरोग्यासाठी अनमोल योगदान दिले. या "आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी" मोफत महाआरोग्य शिबिरांची नोंद सलग दोन वेळा आंतराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार देऊन घेतली गेली. तानाजी सावंत यांच्या या समर्पित सेवेला प्रतिसाद म्हणून आज पंढरपूर येथे वारकरी बांधवांनी एकत्र येत विठ्ठल-रुक्मिणीची पूजा केली.

टाळ-मृदंगाच्या गजरात विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना करत त्यांनी मुख्यमंत्र्यांना आणि उपमुख्यमंत्र्यांना विनंती केली की, प्रा. डॉ. तानाजी सावंत यांना मंत्रिमंडळात पुन्हा एकदा आरोग्यसेवेची जबाबदारी सोपवावी. "तानाजी सावंत यांच्या कायार्मुळे आम्हाला वारीत आरोग्याच्या दृष्टीने खूपच मदत झाली. त्यांच्या संकल्पनेतून आम्हाला आरोग्याची उत्तम सेवा मिळाली," असे मत वारकरी बांधवांनी व्यक्त केले.

पंढरपूरच्या पवित्र भूमीतून दिलेला हा संदेश तानाजीराव सावंत यांच्यावरील वारकऱ्यांच्या विश्वासाला आणि प्रेमाला अधोरेखित करतो. राज्य शासनाने याची नोंद घेऊन त्यांच्या अनुभवाचा आणि सेवाभावाचा योग्य सन्मान करावा, अशी अपेक्षा सर्वत्र व्यक्त होत आहे.

# मागे हटणार नाही, शेतकऱ्यांचा पैसा येईपर्यंत लढणार - राजेंद्र राऊत

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एका रुपयातही मी मिंदा नाही. सभासदांनी काबाड कष्टाने कमावलेली पुंजी बँकेत ठेवली. तत्कालीन संचालकांनी नियमबाह्य व बेकायदेशीर कर्जवाटप केल्याने कर्जे थकली, एनपीए वाढला.

सभासदांना अनेक वर्षांपासून लाभांश मिळत नाही, नव्या शेतकऱ्यांना पीककर्ज मिळत नाही. बँकेतील हा कारभार २०११ मध्ये मीच बाहेर काढला. त्यासाठी मंत्रालय, उच्च न्यायालयापर्यंत संघर्ष केला. शेतकऱ्यांच्या हक्काचा पैसा पूर्णताः वसूल होईपर्यंत मी थांबणार नाही. शेतकऱ्यांचा पैसा वसूल होईपर्यंत कोणालाही सोडणार नाही? अशी ठाम भूमिका याचिकाकर्ते तथा माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी व्यक्त केली. माजी आमदार राऊत म्हणाले, सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयापर्यंत आवाज उठविल्याने शेवटच्या न्यायालयाच्या आदेशाने बँकेच्या नुकसानप्रकरणी तत्कालीन संचालक, अधिकारी व कर्मचारी यांच्यावर २३८ कोटी रुपयांची जबाबदारी निश्चित केली आहे. निश्चित झालेल्या जबाबदारीतून ही रक्कम वसूल करण्यासाठी जिल्हा बँकेला सहकार कायदा कलम ९८ अन्वये वसुली दाखला मिळाला आहे.

या प्रकरणातील मंडळी कायद्याच्या बाबतीत हुशार आहेत. त्यांना कायद्यातील पळवाटा आणि सत्तेचा लाभ कसा उठवायचा? हे चांगले माहिती आहे. गेल्या १३ वर्षापासून मी देखील ही प्रक्रिया कोळून प्यालो आहे. त्यामुळे मी देखील तयारी केली आहे. या प्रक्रियेला स्थगिती मिळू नये, ही प्रक्रिया वेळेत पार पाडावी यासाठी मी सहकार मंत्रालय व उच्च न्यायालय या ठिकाणी कॅव्हेट दाखल केल्याची माहितीही माजी आमदार राऊत यांनी दिली.




> वसुली आदेश मिळालेली रक्कम २३८ कोटी आहे. संबंधित कर्जखाती एनपीएनमध्ये गेल्यापासून वार्षिक १२ टक्के व्याजाने ही रक्कम वसूल होणार आहे. साधारणतः ९५० कोटी रुपये बँकेला मिळतील. बँकेचा संचालक म्हणून जबाबदारी पार न पाडल्याने केलेली ही कारवाई आहे. यातील बहुतांश संचालक/नातेवाईक हे कर्जदार आहेत. कर्जदार म्हणून होणारी कारवाई ही वेगळी आहे. थकीत कजार्ची वसुली झाल्याशिवाय बँक नफ्यात येणार नाही आणि नव्या शेतकऱ्यांना कर्जवाटप, सभासदांना लाभांश वाटप होणार नाही. शेवटचा रुपया वसूल होईपर्यंत माझा लढा सुरूच राहील.
>
> **- राजेंद्र राऊत,** माजी आमदार तथा याचिकाकर्त

### सहकारमंत्र्यांनाही पत्र देणार

राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आले आहे. या सरकारमध्ये सहकारमंत्री कोण होईल माहिती नाही, जे कोणी सहकारमंत्री होतील त्यांना मी पत्र देणार असल्याचे माजी आमदार राऊत यांनी सांगितले. ही प्रक्रिया वेळेत संपवा, यामध्ये विलंब लावू नका, अशी विनंती करणार आहे. पुन्हा उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाण्याची माझी तयारी आहे. देशातील सहकारी बँकांना आदर्श ठरेल, सहकारी बँकांना शिस्त लावेल, सहकारातील सभासद, शेतकऱ्यांचे हित जोपासेल असाच अंतिम निकाल या प्रकरणाचा असेल, असा विश्वासही माजी आमदार राऊत यांनी व्यक्त केला आहे.

श्रीहरी बहुउद्देशीय व संशोधन संस्था, संचलित
शार्वी अभ्यासिका
दि. १५ ऑगस्ट २०२४ पासून आपल्या सेवेत
जुळे सोलापूरातील पहिली अत्याधुनिक अभ्यासिका
वैशिष्ट्ये
✓ वातानुकूलित सुसज्ज इमारत, प्रसन्न वातावरण व माफक फी
✓ शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था प्रत्येक जागा आरक्षित
✓ मुलां-मुलींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था स्वतंत्र प्रसाधनगृह
✓ दर्जेदार दैनिक वर्तमान पत्रे, मासिके इ. मोफत उपलब्ध
✓ आरामदायी बैठक, डेस्क लॅम्प प्रदुषणमुक्त वातावरण
✓ लॅपटॉप, मोबाईल चार्जिंगसाठी स्वतंत्र पॉईंट मर्यादित प्रवेश क्षमता
✓ वेळोवेळी तज्ञांचे योग्य मार्गदर्शन वाहन तळाची सोय
✓ वर्षभरासाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत

पत्ता : एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर.
संपर्क : (०२१७) २६०५०९१ /८८५६९२७९४७

## संपादकीय

# स्वागतार्ह निर्णय

फेब्रुवारी 2025 मध्ये दिल्ली विधानसभेची निवडणूक होईल. यावेळी स्वबळावर लढण्याची घोषणा काँग्रेसने केली आहे. तोच कित्ता आम आदमी पार्टीनेही गिरवला आहे. कागदावर मतांचे गणित करून हिशेब मांडणार्‍यांना काँग्रेस आणि आप या दोन्ही पक्षांचा निर्णय चुकीचा वाटू शकतो. त्यांच्या मतांची विभागणी होईल असा तर्क त्याकरता दिला जाऊ शकतो. पण कोणा एकाला संपूर्ण वर्चस्व बहाल करून दिल्लीचे भले होणार नाही आणि झालेही नाही. त्यामुळे ज्यांना उपलब्ध दोन सक्षम पर्याय नको असतील तर त्यांना जुना, अनुभवलेला पर्यायही उपलब्ध आहे व त्याचा ते वापर करू शकतात. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या या निर्णयाचे स्वागतच करायला हवे. स्वबळावर लढण्याचा निर्णय आत्मघातकी कसा हे स्पष्ट करण्यासाठी अलीकडेच झालेल्या हरियाणा विधानसभा निवडणुकीचे उदाहरण दिले जाते आहे. या राज्यातील 90 पैकी 48 जागा जिंकून भारतीय जनता पार्टीने हॅट्रिक केली. काँग्रेसलाही 37 जागा मिळाल्या. आम आदमी पार्टीला खाते उघडता आले नाही. काँग्रेस नेते राहुल गांधी यांना 'आप'शी आघाडी करायची होती. प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांना मात्र स्वबळावर सत्ता काबीज करण्याचा विश्वास असल्यामुळे त्यांनी राहुल यांच्या इच्छेपुढे मान तुकवली नाही.

असेही नुकताच आलेला लोकसभेचा निकालही त्यांच्या पथ्यावर पडला. प्रचंड हवा निर्माण करूनही 'आप'ने हरियाणात एकच जागा जिंकली. विधानसभेत भाजपला 39.94 तर काँग्रेसला 39.09 टक्के मते मिळाली. आपला 1.79 टक्के मतदारांनी पसंती दिली. भाजप आणि काँग्रेसला मिळालेल्या मतांमध्ये अत्यंत सूक्ष्म अंतर आहे मात्र तरीही भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले. त्यामुळेच दावा करणार्‍यांचे म्हणणे असे आहे की जर काँग्रेस आणि आप एकत्र लढले असते, तर काँग्रेस सत्तेत राहिली असती आणि भाजपची स्थिती बिकट झाली असती. हे गणित मांडणार्‍यांचा तर्क बिनतोड असला, तरी त्यात मतदारांना गृहीत धरण्याची जी सवय आहे तीही डोकावते. काँग्रेस आणि आप एकत्र आले असते तर कदाचित दोन्ही पक्षांना आता जी मते मिळाली आहेत तीही त्यांना मिळाली नसती आणि ती अन्य किंवा भाजपकडे गेली असती याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. निवडणूक रणनीतितज्ज्ञ प्रशांत किशोर यांनी बिहारसंदर्भात हाच तर्क मांडला आहे.

या राज्यात राष्ट्रीय जनता दल नको, पुन्हा जंगलराज नको म्हणून लोक राष्ट्रीय लोकशाही आघाडीला नाईलाजाने मतदान करत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ते अन्य कोणाच्या पचनी पडले असेल नसेल मात्र 'आप'च्या अरविंद केजरीवाल यांना समजले. सहा महिन्यांपूर्वी त्यांनी दिल्लीत काँग्रेससोबत लोकसभा एकत्रितपणे लढवली. दोन्ही पक्षांची मतांची बेरीज केली तर भाजपला ते सहज पराभूत करू शकले असते. प्रत्यक्षात त्यांना खातेही उघडता आले नाही. राजधानीतील सर्व 7 जागा भाजपने जिंकल्या. आता विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला सोबत घेतले, तर काँग्रेसला मतदारांच्या असलेल्या विरोधाचा फटका आपल्याला बसू शकतो आणि त्यामुळे मते भाजपकडे जाऊ शकतात याची केजरीवालांना कल्पना असल्यामुळे इंडिया आघाडीत राहूनही पहिला दगड कोणी मारायचा याचा काँग्रेस आणि आप दोघेही वाट पाहात होते. केजरीवाल हिशेबी राजकारणी आहेत, त्यांचा फायदा त्यांनी बघितला.

तथापि, काँग्रेसने मात्र या संधीचा फायदा घेण्याची गरज आहे त्याचे कारण कोणी काहीही म्हटले तरी केजरीवालांचा दिल्लीत आणि एकूणच देशातील राजकारणात उदय हा काँग्रेसच्या मुळावरच झाला आहे. यासंदभार्तील आकडेवारी अगदी बोलकी आहे. 2013 मध्ये काँग्रेसला दिल्ली विधानसभेत जवळपास 25 टक्के मते मिळाली. नंतर 2015 मध्ये 9.7 तर 2020 मध्ये केवळ 4.3 टक्के मते मिळाली. यातील 2013 मध्ये काँग्रेसला 8 जागा मिळाल्या आणि नंतरच्या दोन निवडणुकांत त्यांना खातेही उघडता आले नाही. कारण त्यांचा जनाधार संपुष्टात आला होता व यातील बहुतांश लोकांनी सक्षम पर्याय म्हणून 'आप'ला स्वीकारले आणि 'आप'ने विरोधक औषधालाही शिल्लक ठेवले नाही असे यश मिळवले. काँग्रेसने जे गमावले तेच 'आप'ने कमावले. हाच प्रयोग त्यांनी हरियाणा, गुजरात, गोवा आणि पंजाबमध्येही केला. यातील प्रत्येक राज्यात काँग्रेसला फटका बसला आणि पंजाबचीही काँग्रेसच्या संदर्भात बोलायचे तर दिल्ली झाली. या राज्यातही 2022 मध्ये आप स्पष्ट बहुमताने सत्तेवर आली. आम आदमी पाटीर्शी हातमिळवणी ही चूक होती असे अलीकडेच दिल्ली काँग्रेसचे अध्यक्ष देवेंद्र यादव यांनी म्हटले आहे. तसेच चूक एकदाच होते, पुन्हा पुन्हा केली जात नाही असेही त्यांनी म्हटले आहे व यावेळी दिल्लीतील सगळ्या जागा लढण्याचा इरादा जाहीर केला. त्यांचे म्हणणे त्यांच्या श्रेष्ठींनी ऐकले आणि खरेच काँग्रेस स्वबळावर लढली तर ते काँग्रेससाठी आणि दिल्लीकरांसाठीही पोषक असणार आहे. सध्याच्या स्थितीत दिल्लीकरांनी लोकसभा भाजपला आणि विधानसभा 'आप'ला अशी विभागणी केली आहे.

तथापि, गेल्या दहा वर्षांतील अनुभव पाहता या दोन्ही पक्षांनी केवळ भांडणेच केली. केजरीवालांना भाजपने काम करू दिले नाही, असा 'आप'चा आरोप आहे, तर भाजपही केजरीवाल आणि कंपनीच्या विरोधात वेगवेगळी प्रकरणे काढून त्या पक्षाला तोडण्याचा प्रयत्न करतो आहे. अशा वातावरणात तिसरा सहमतीचे, सहअस्तित्वाचे राजकारण करणारा पक्ष उभा राहिला आणि तो स्वतंत्रपणे जाणार असला, तर मतदारांना ते हवेच असेल.

पान १ वरून

## मंत्रिमंडळ विस्तार लांबणार?...

**कोणाला किती मिळणार मंत्रिपदे?**

कोणाला किती मंत्रिपदे आणि कोणती खाती यावर अंतिम निर्णय झालेला नाही. भाजपला २२, शिंदेसेनेला १२ आणि अजित पवार गटाला ९ मंत्रिपदे दिली जाऊ शकतात.

विधान परिषदेच्या आमदारांना मंत्रिपद दिले जाणार नाही, याबाबत तिन्ही पक्षांमध्ये सध्या तरी एकमत आहे. मात्र, एक-दोन वजनदार विधान परिषद सदस्यांबाबत ऐनवेळी अपवाद केला जाऊ शकतो. जुन्या मंत्र्यांपैकी एका-दोघांना धक्का दिला जाऊ शकतो.

**घटक पक्षांच्या नावांवरही भाजप नेतृत्वाशी चर्चा**

वादग्रस्त चेहर्‍यांना मंत्रिमंडळात घेऊ नये, असा भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वाचा आग्रह असल्याचे म्हटले जाते.

भाजपच्या मंत्र्यांच्या नावांना फडणवीस हे दिल्लीतील नेतृत्वाकडून मंजुरी घेतीलच; पण अन्य दोन पक्षांची नावे अंतिम करण्यापूर्वी एकदा भाजपच्या नेतृत्वाशी चर्चा करावी, असे त्यांना सांगण्यात आल्याची माहिती आहे.

**अ‍ॅड. राहुल नार्वेकर विधानसभाध्यक्ष?**

विधानसभेच्या अध्यक्षपदी भाजपकडून अ‍ॅड. राहुल नार्वेकर यांनाच पुन्हा संधी दिली जाण्याची शक्यता आहे.

# भ्रष्टाचार: देशाला लागलेली किड

**(आंतररष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिनानिमित्त विशेष लेख)**

आज ९ डिसेंबर, आजचा दिवस संपूर्ण जगात भ्रष्टाचार विरोधी दीन म्हणून साजरा केला जातो. भ्रष्टाचार ही आज जगातील सर्वात मोठी समस्या बनली आहे. भारतातच नाही तर जगात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघड होत आहेत. जगात असा एकही देश नाही जिथे भ्रष्टाचार होत नाही. भारतात तर आज भ्रष्टाचार शिष्टाचार बनला आहे. जगातील सर्वात भ्रष्ट देशांच्या यादीत भारताचा क्रमांक लागतो ही खेद जनक बाब आहे. भ्रष्टाचाराची ही किड भारतात खोलवर रुजली आहे. भ्रष्टाचाराची ही किड देश पोखरत चालली आहे. भारतातील भ्रष्टाचार कमी करणार असे सर्वच राजकीय पक्ष सांगतात. देशातील भ्रष्टाचार संपवणार अशी प्रतिज्ञाच काही राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी केली होती पण देशातील भ्रष्टाचार संपवणे तर दूरच पण दिवसेंदिवस देशातील भ्रष्टाचार वाढत चालला आहे. अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील ग्लोबल फायनांशियल इंटिग्रेटी या भ्रष्टाचारावर सर्व्हे करणाऱ्या संस्थेने मागील वर्षी एक अहवाल सादर केला होता. या अहवालानुसार गेल्या सत्तर वर्षात लाचखोरीमुळे देशाचे ४५०अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. ४५० अब्ज डॉलर ही काही छोटी रक्कम नाही. भ्रष्टाचारी लोकांनी देशाची ४५० अब्ज डॉलर पचवले. हे ४५० अब्ज डॉलर गोरगरिबांच्या मेहनतीचे होते मात्र भ्रष्टाचाऱ्यांनी खुर्ची आणि पदाचा गैरवापर करून गोरगरिबांना फसवले आणि त्यांच्या मेहनतीचे पैसे लाटले.

देशाला लागलेली ही भ्रष्टाचाराची किड आता लागलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यापासून हा भ्रष्टाचार सुरू आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहलाल नेहरू एकदा उद्विग्न होऊन म्हणाले होते की भ्रष्टाचाऱ्यांना सुळावर लटकवले पाहिजे. मात्र आजवर एकाही भ्रष्ट अधिकाऱ्याला सुळावर लटकवणे तर दूरच मात्र शिक्षा झाल्याचेही ऐकवात नाही. त्यामुळेच भ्रष्टाचार वाढत चालला आहे. दररोजचे वर्तमानपत्र वाचा त्यात तुम्हाला एक तरी भ्रष्टाचाराची किंवा लाचखोरीची बातमी वाचायला मिळेल. एका एका भ्रष्ट अधिकाऱ्याकडे कैक कोटींची अवैध मालमत्ता आढळत आहे. असा कोणताही विभाग नाही ज्यात भ्रष्टाचार होत नाही. महसूल आणि पोलीस विभाग भ्रष्टाचारात अव्वल असेल तरी सर्वच विभागात भ्रष्टाचार सर्रास चालू आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राला देखील भ्रष्टाचाराने घेरले आहे. जो विभाग समाजाला नैतिकतेचे धडे देतो त्याच विभागात भ्रष्टाचारासारखे अनैतिक काम राजरोसपणे सुरू आहे.

देशातील भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, योग गुरू रामदेव बाबा यांच्यासह काही सामाजिक कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतर वर उपोषणाला बसले होते. त्यांच्या आंदोलनाला जनतेतूनही मोठा पाठिंबा मिळाला होता. आता सत्तेत असलेल्या भाजपच्या नेत्यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. देशभर भ्रष्टाचार विरुद्ध वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी देशातून भ्रष्टचार नष्ट होईल असे वाटले होते. त्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. भाजप केंद्रात सत्तेवर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाऊंगा....... ना खाणे दुंगा..... असा इशारा भ्रष्टाचाऱ्यांना दिला. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली. देशातील लोकांना वाटले आता तरी भ्रष्टाचार कमी होईल मात्र तसे काही झाले नाही उलट भ्रष्टाचारात वाढच झाली. त्यातही गंमत म्हणजे ज्या भ्रष्टाचाऱ्यांना विरोध करून भाजप सत्तेत आली आज त्याच भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेऊन भाजप पावन करत आहे.

ट्रेस मेट्रिक्स २०२१ च्या अहवालात भारत लाचखोरीत इतर देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे. याचाच अर्थ देशातील भ्रष्टाचार कमी झाला नाही.

आज कोणत्याही सरकारी कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. दररोजचे वर्तमान पत्र उघडले की एक तरी लाचखोरीची बातमी वाचायला मिळतेच. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन लाचखोर त्यांनाच जाळ्यात अडकवत आहे. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांश जनतेला आला आहे. राजस्थानमधील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते. महाराष्ट्रातील ५५ टक्के लोकांचे हेच म्हणणे आहे. याचाच अर्थ लाचखोरी सामान्य होत आहे. पूर्वी भ्रष्ट्राचाऱ्यांकडे द्वेष भावनेने पाहिले जाते होते. आता मात्र त्यांच्या संपत्तीवरून त्यांचा सन्मान होत आहे. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## मुंबईत महायुती सरकारचा शपथविधी सोहळा सोलापुरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांचा जल्लोष

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मतदार राजा व लाडक्या बहिणींच्या आशीवार्दाने पुन्हा एकदा महायुतीला महाराष्ट्रात घवघवीत यश मिळाल. महाराष्ट्रात केलेल्या विकास कामांच्या जोरावर जनतेच्या मनातील सरकार सत्तेवर आल. कॉमन मॅन मुख्यमंत्री विकासाचा एकच वादा अजित दादा आणि देवाभाऊ यांनी महाराष्ट्रात पुन्हा एकदा विकासाची ज्योत प्रज्वलीत केली.गुरुवारी मुंबईत मुख्यमंत्री शपथ विधी सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत जल्लोषात संपन्न झाला. मी पुन्हा येणार हे वाक्य देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा सिद्ध करून दाखवलं आणि मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्यात एकनाथ शिंदे व अजितदादा यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.या शपथ विधीचा जल्लोष सोलापूर सह संपूर्ण महाराष्ट्रात करण्यात आला. जुनी मिल कंपाऊंड येथील राष्ट्रवादी भवन कार्यालया समोर जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार यांच्या आदेशान्वये व कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या नेतृत्वात फटाक्यांची आतिषबाजी,गुलालाची मुक्त उधळण, ढोल - ताशाच्या



निनादात हा जल्लोष साजरा करण्यात आला.यावेळी महायुती सरकारचा विजय असो,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय असो, एकच वादा अजित दादा विकासाचा वादा अजित दादा या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

यावेळी सोलापूर शहर जिल्हा कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान, जनरल सेक्रेटरी प्रमोद दादा भोसले, ज्येष्ठ नेते श्रीनिवास कोंडी सर, महिला शहराध्यक्ष संगीता ताई जोगदनकर, महिला शहर कार्याध्यक्ष चित्रा ताई कदम, सेवादल अध्यक्ष प्रकाश भाऊ जाधव, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष आमिर भाई शेख, युवती शहराध्यक्ष किरण ताई माशाळकर, दक्षिण महिला कार्याध्यक्ष कांचन ताई पवार, सरचिटणीस अर्चना ताई दुलंगे,सुरेखा ताई घाडगे,युवक कार्याध्यक्ष तुषार जक्का , युवक पक्ष संघटक दत्ता बडगंची, डॉक्टर सेल अध्यक्ष संदीप माने, डॉक्टर विश्वजीत रजपूत, वैद्यकीय शहराध्यक्ष बसवराज कोळी, सरचिटणीस शामराव गांगर्डे, महेश कुलकर्णी, उत्तर विधानसभा अध्यक्ष एड अमोल कोटीवाले, दक्षिण विधानसभा अध्यक्ष श्रीकांत वाघमारे, भास्कर अडकी, प्रकाश झाडबुके, एम एम इटकळे, दक्षिण अल्पसंख्यांक अध्यक्ष मूहीज मुल्ला, दक्षिण अल्पसंख्यांक संघटक जाहीर शेख, अल्पसंख्यांक शहर उपाध्यक्ष समदानी मत्तेखाने, कुमार जंगलेकर, असंघटित कामगार अध्यक्ष मार्तंड शिंगारे, संजय सांगळे, दक्षिण विधानसभा कार्याध्यक्ष प्रदीप बाळशंकर, दत्ता बनसोडे, प्रज्ञासागर गायकवाड, श्रेयस घाडे, यांची उपस्थिती होती.

## अंकुश अवताडे यांनी दिल्या मुख्यमंत्री फडणवीस यांना शुभेच्छा

**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** राज्यामध्ये विरोधकांनी टाकलेलं चक्रव्यूह भेदून अतुलनीय कामगिरी करत भाजपाच्या सर्वाधिक जागा निवडून आणल्या शिवाय तिसऱ्यांदा मुख्यमंत्री पदी विराजमान झाल्याबद्दल भाजपा मोहोळ युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अंकुश अवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन शुभेच्छा देत अभिनंदन केले.



यावेळी बोलताना आवताडे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत भाजपा व महायुतीला राज्यात अपेक्षित यश मिळालं नाही. मात्र ती मरगळ झटकून लोकसभा निकालाच्या दुसऱ्या दिवशीच भाजप कामाला लागली होती. विधानसभा निवडणुकीत जागा वाटप करण्यापासून ते प्रचार आणि प्रसाराचे सूक्ष्म नियोजन करून देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्वच मतदारसंघात मायक्रो प्लॅनिंग केले. शिवाय राज्य सरकारने राबविलेल्या सर्वसामान्य जनता, शेतकरी, नोकरदार, व्यावसायिक यांच्या बद्दलचे असलेले धोरण जनतेने स्वीकारले आणि लाभार्थी जनतेने देवेंद्र फडणवीस अर्थात भाजपला स्वीकारले. त्यामुळे या यशाचं सर्व श्रेय टीम लीडर म्हणून देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना जाते असे त्यांनी सांगितले.

दरम्यान निवडणुकीतील या विजयाबद्दल व सरकार स्थापन केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ. श्रीकांत भारतीय, आ.विक्रांत पाटील यांची प्रतिमा भेट देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

**प्रबोधन**

# रूढी मोडा, प्रगती करा

रूढिरेव बलीयसि अर्थात 'रूढीं भयंकर बलिष्ठ असतात. हे नुसतं ऐकून, होकारार्थी मान हालवून फारसं कळणार नाही; त्यासाठी अनुभव घेण्याची तयारी ठेवल्यास त्यांची राक्षसी ताकद नक्की कळेल. वटसावित्रीच्या व्रतामध्ये काही अर्थ नसतो. कारण आत्मा, यमराज, पुनर्जन्म आदि सफेद झूठ आहेत, असं लेक्चर कॉलेजात देणाऱ्या प्राध्यापिका कॉलेज सुटताच वटवृक्षाला सूत गुंडाळून फेऱ्या घालताना दिसतात. रूढी ह्या राक्षसी आहेत, हे कळतं पण त्यांच्या विळख्यातून कसं सुटावं हे मात्र कळत नाही. कळतं पण वळत नाही असा हा सारा गचाळ मेंदूचा कारभार आहे. म्हणूनच विद्वान रूढिरेव बलीयसि म्हणून माथा ठोकत गप्प बसतात. लोकांच्या रूढिप्रियतेचं रहस्य सांगताना स्वामी विवेकानंद म्हणतात, 'प्रत्येकाच्या मेंदूत विचाररेषा असतात. पण नव्या नव्या विषयावर बोलल्याशिवाय त्या रेषा स्पष्ट होत नाहीत. ज्या विचारशील, स्पष्टवक्त्यांनी विचार करून, बोलून ह्या रेषा स्पष्ट, ठळक केल्या ते रूढीच्या कचाट्यातून सुटतात. मात्र ज्यांनी रूढींची चिकित्साच केली नाही, त्यांच्यातील दोषांवर बोलण्यासाठी तोंड उघडलं नाही, ते लोक रूढिप्रियच असतात. लोकांच्या रूढिप्रियतेचं गुपित हे असं आहे.' रूढी म्हणजे धर्म नव्हे. रूढींचं पालन केलं नाही म्हणजे काही धर्म बुडत नाही (आणि जरी धर्म बुडाला तरी काही आपण मरणार नाही.). त्याविषयीसुद्धा स्वामीजी म्हणतात, 'ज्याला आपण धर्म म्हणतो तो क्षुद्र, खुळचट रूढींमध्ये सामावलेला आहे. (उदा. वटसावित्री व्रत, शनिमहात्म्य वाचणे, गुढी उभारणे, होळी इत्यादि) स्थानिक रूढी असंख्य आहेत. पण रूढी म्हणजे खरा धर्म असं अज्ञानी लोक मानतात. ती त्यांची फार मोठी चूक असते. स्थानिक, खुळचट रूढींना वेद, स्मृती वा पुराण कुणाचाच आधार नसतो. पण अज्ञ लोक धर्म कुणाचाच आधार नसतो. पण अज्ञ लोक धर्म बुडण्याच्या भीतीपोटी त्यांचं पालन करतात. रूढींचा त्याग केल्याने चांगला माणूस होता येतं, हेही त्यांना कळत नाही. आज एखाद्या खेड्यातील क्षुल्लक रूढी ही उपनिषदाच्या उपदेशापेक्षा श्रेष्ठ मानली जात आहे.' 'पण लक्षात कोण घेतो' ही ह. ना. आपटे यांनी कादंबरी खळबळ माजवून गेली. कादंबरीची नायिका यमू ही दुष्ट शंकरमामंजीच्या केश- वपनाच्या रूढिप्रियतेची बळी झाली. त्याकाळी पतिनिधनानंतर ब्राह्मण विधवा स्त्रीचे केस काढून तिला बोडकी करीत. आज ही रूढी मोडीत निघाली म्हणून काही सनातनी ब्राह्मणांचंही घोडं कुठं अडलं नाही. संत तुकडोजी यांनी ग्रामगीतेत रूढीपालनाचा उपहास केला आहे. ते म्हणतात,

स्वये म्हणवी राम भक्त ।
नाही एकपत्नीव्रत ।
नित्य पूजितो हनुमंत।
व्यसने झाला प्रेताऐसा ॥

पाडव्यादिवशी द्युत (जुगार खेळण्याची रूढी आहे. त्याविषयी ते म्हणतात,

काही पाडवा जुगार खेळती ।
ही आहे समाजाची अधोगती ।
काही लोक जिंकोन जाती ।
काही हरती वस्त्रेही ॥

रूढी ह्या अजर, अमर, चिरंतन, सनातन नसतात. बऱ्याच जुन्या रूढी नष्ट होतात तर बऱ्याच नव्या रूढी मूळ धरतात. विवेकानंद म्हणतात, 'श्रुतींमध्ये ईश्वर, जीव इत्यादी विषयांवरील सत्ये असतात. पण स्मृतींमध्ये विशिष्ट स्थानी, विशिष्ट परिस्थितीत आचरण्याची कर्तव्यं सांगितलेली असतात आणि म्हणूनच ती कालमानानुसार बदलतात. एखादी क्षुद्र सामाजिक रूढी बदलली म्हणजे धर्म बुडत नाही. उदा. वेदकाळी गोमांस खाणाराच ब्राह्मण समजला जाई. पण कृषिविकासामुळे गाईचं महत्त्व वाढलं. कारण बैलांची पैदास तिच्याशिवाय शक्य नव्हती म्हणून ती रूढी बंद पडली.'

एकादशी करण्याची रूढी महात्मा चक्रधरांनी मोडली. ग्रंथ संस्कृत भाषेतच लिहावेत, ही रूढी ज्ञानदेवांनी मोडली. नवसांची रूढी तुकोबांनी मोडली, (नवसे कन्या-पुत्र होती, तर का करणे लागे पती? असा रोकडा प्रश्न त्यांनी विचारला.) अंत्यज पोर कडेवर घेऊन एकनाथांनी अस्पृश्यतेची रूढी मोडली. देव आणि भक्त यांच्यामध्ये भट-दलाल नको म्हणून महात्मा जोतिरावांनी रूढिभंग केला. सती प्रथा राजा राममोहन रॉय यांनी मोडीत काढली. राजर्षी शाहूंनी पुराणोक्त मंत्रांची रूढी मोडून काढली. हे सारे रूढिभंजक समाजावर अनंत उपकार करून गेले. पण समाज हा या सर्व थोरांच्या रूढीभंजक वृत्तीचे अनुकरण करतोय का? रूढिप्रिय देश चिखलात रुतलेल्या हत्तीसारखा असतो. आपणाला प्रगती करायची असेल तर रूढींच्या चिखलातून आपण शक्य तितिक्या लवकर बाहेर पडलं पाहिजे. कारण-

रूढिराक्षसींनी । किती लोक खाल्ले
किती हाल केले । काय सांगू १
रूढी छळतात । रूढी पिळतात
रूढी गिळतात । समाजाला ॥२
रूढी निरर्थक` अन्यायकारक
रूढी त्या मारक । भोळ्या जना ॥३
समाजहिताच्या । लावूनी कसोट्या
पहा खऱ्या-खोट्या । रूढी कशा ॥४
व्यक्तीच्या हिताला । साधक-बाधक
तारक-मारक । पाहा रूढी ॥५
अनर्थ दिसतो । ज्या ज्या रूढीमध्ये
अशा रूढीमध्ये । गुंतू नका ॥६
समाजाला मागे। नेणाऱ्या रूढींना
दूर फेकताना । नको दुःख ॥७
दुष्ट रूढींशी जो । शत्रुत्व करतो
तोच पुढे नेतो । समाजाला ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणजे विकासाचे व्हिजन असणारे लोकाभिमुख नेतृत्व - चेतनसिंह केदार सावंत

### जिल्ह्यात भाजपच्या कार्यकर्त्यांचा जल्लोष, फटाक्यांची आतषबाजी, मिठाईने वाढवला गोडवा

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतल्यानंतर राज्यात पुनश्च विकासपर्व सुरू होणार आहे. देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ मध्ये आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात राज्यात सर्वांगीण विकासाची पायाभरणी केल्यामुळे, आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात विकासासह रस्ते, रेल्वे आणि मेट्रोचे जाळे विस्तारले आहे. महाराष्ट्रात अनेक विकासाभिमुख प्रकल्पांची मुहूर्तमेढ रोवली, त्यांची सुरुवात केली. देवेंद्र फडणवीसांसारखे दूरदृष्टी लाभलेले नेतृत्व विकसित महाराष्ट्राला आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक क्षेत्रात नव्या उंचीवर घेऊन जाईल, यात शंका नाही. देवेंद्र फडणवीस म्हणजे कार्यकर्त्यांना आधार देणारा लोकाभिमुख नेता आणि विकासाचे व्हिजन असणारे लोकाभिमुख नेतृत्व होय अशा शब्दात भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या.

राज्याचे ३१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा शपथ घेणार असल्याने सोलापूर जिल्ह्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजता राष्ट्रगीत आणि महाराष्ट्रगीताने या शपथविधी सोहळ्याची सुरुवात होताच, सांगोला तालुक्यासह माळशिरस, करमाळा , माढा, बार्शी तालुक्यातील चौकाचौकात लावण्यात आलेल्या स्क्रीनवर देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीचा



ऐतिहासिक क्षण अनुभवण्यासाठी रस्त्याने जाणारा प्रत्येक जण थांबला.

देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री बनल्याने भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत आणि एकमेकांना पेढे भरवत जल्लोष साजरा केला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्याचे स्क्रीन उभारून प्रक्षेपणही करण्यात आहे.

सोलापूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी लाइव्ह स्क्रीनवर दाखविण्यात आला. परिसरातील नागरिकांनी तसेच भाजप कार्यकत्यांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. शपथविधी पूर्ण झाल्यानंतर जोरदार आतषबाजी करण्यात आली. चौकाचौकात ढोल-ताशांचा गजर सुरू होता अन दुसरीकडे शपथविधी सोहळा स्क्रीनवर पाहताना सगळे आनंदून गेले होते. देवेंद्र फडणवीसांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेताच भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडत, पेढे, जिलेबी वाटत ढोलताश्यांवर जल्लोष साजरा करीत देवेंद्र पवार्चे स्वागत केले. देवाभाऊ, देवाभाऊ आपला लाडका देवाभाऊ, भारत माता की जय अशा घोषणा देत आनंद साजरा केला. ठिकठिकाणी भाजपच्या कार्यकर्त्यांनी कार्यकर्त्यांनी ढोल-ताशांच्या गजरात मिठाई वाटून जल्लोष केला. उत्साही कार्यकर्त्यांनी यावेळी हातात भाजपचे झेंडे घेत हवेत फिरवून वातावरण बदलून टाकले. गुलालाची उधळण करुन आनंद व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांनी पेढे वाटून आंनद जल्लोष केला.

**वात्रटिका**

### एका माळेचे मणी

जीव तोडून बोलले तरी
विश्वास बसत नाही...
राजकारणात काय होईल
काही सांगता येत नाही...
एकमेकांविरुद्ध लढले ते
एकमेकांजवळ बसतात...
कोण कोणाचा वैरी नसतो
अशी वरून पुष्टी मारतात...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

